**हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र**

**पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.**

**दिनांक ३०.०९.२०२२**

अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :— मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २९/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०० वाहन चालकाविरूध्दकार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन ६५,८५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :— मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधदारूविक्री कायदया अंतर्गत दिनांक २९/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदयाअंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोस्टे सेनगाव ०१,बासंबा ०१,वसमत शहर ०१ असे एकुण ०३ ठिकाणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन ८.७३ लिटर दारू असा एकुण ५,९४० रू.किअं.अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदया अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

चोरी :— दिनांक २९/०९/२०२२ रोजी फिर्यादी योगेशकुमार रमेश अग्रवाल व्य.सेल्समॅन रा तिरूपती नगर कळमनुरी यांचे फिर्यादी वरून पोस्टे कळमनुरी येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२७.०९.२२ रोजी चे २०:०० वा ते २८.०९.२२ रोजी चे ०६.३० वा चे दरम्यान फिर्यादीचे घरासमोर तिरूपती नगर कळमनुरी येथे यातील फिर्यादीचे घरा समोर उभी असलेली हिरो एच एफ डिलक्स मोसा क्र एमएच ३८ एई ०९९६ हि लाल काळया रंगाची किअं.६५,००० रू. कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करित आहेत.

दिनांक २९/०९/२०२२ रोजी फिर्यादी गजानन विष्णु गावंडे रा कन्हेरगाव नाका ता जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे गोरेगाव येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२८.०९.२२ रोजी चे १२:३० वा ते १४.०० वा चे दरम्यान कन्हेरगाव शिवारातील रेल्वे गेट लगत रोडवर फिर्यादीची मोसा जिचा क्र एमएच ३८ आर ६७८० हि कनेरगाव नाका ते गोरेगाव जाणारे रोडचे कडेला रेल्वे गेटचे पुलाजवळ उभी करून काम करण्यासाठी गेला असता कोणी तरी अज्ञात चोरटयांनी फिर्यादीची वरील मोसा चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात गोरेगाव पोलीस तपास करित आहेत.

पोलीस अधीक्षक हिंगोली
करिता